ड

FORM-1 A                                                                 N.C.R.B.
I.I.F.

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station भ्र.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 08 वर्ष Year 2018 दिनांक Date 07/09/2018

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र. अधिनियम 1988, कलमे Sections कलम 7
(ii) अधिनियम Act (सुधारित अधिनियम 2018), कलमे Sections
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day सोमवार, तारीख पासून Date from 07/9/18, वेळ Time 10.05, तारीख पर्यंत Date to 07/9/18, वेळ Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date 07/09/2018, वेळ Time 10.05 वा.
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. /2018, तारीख Date /09/2018 वेळ Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. अंदाजे 10 कि.मी. पूर्वेस, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name गृह निर्माण भवन म्हाडा मुंबई, ठिकाणाचे नंबर No. if any कक्ष क्र 325, गल्ली Ward दुसरा माळा, रस्त्याचे नाव Name of road कलानगर
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place वांद्रे कलानगर, गाव Village, पोस्ट Post, तालुका Taluka मुंबई, जिल्हा Distt. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station, तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री इश्तियाक, (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name मेहमुद खत्री
(c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age 28 वर्षे, (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 9004834570
(e) पारपत्र क्रमांक Passport No. 8012920456410, दिल्याचा दिनांक Date of Issue, दिल्याचे ठिकाण Place of Issue, (f) व्यवसाय Occupation ठेकेदार
(g) धर्म Religion मुस्लीम, जात Caste सुन्नी, जनजात Sub-Caste
(h) पत्ता Address : गल्ली / सर्वे नं. Ward, घर / नाव नंबर House/Name No., फोन / मो. नंबर Phone/M. No., पॅन नं. Pan No., वोटर्स नं. Card No.
फ्लॅट नं. 504, B-3 बिल्डींग, लोखंडवाला पार्क हौसिंग सोसायटी समोर सोने गुरूजी शाळा पाकीजा हॉटेलच्या मागे साकीनाका (प) मुंबई 58
रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.
तालुका Taluka, जिल्हा Distt., राज्य State, सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

रशीद अली हैदर शेख वय 53 वर्षे धंदा नोकरी विभागीय लेखापाल/विभाग-1 सहाय्यक लेखा अधिकारी परिमंडळ-1 इमारत दुरूस्ती मंडळ म्हाडा मुंबई रा.ठी कमरा 606 A-विंग टाम.के बिल्डींग वृंदावन कॉलनी आयुषमान रूग्णालयचे बाजुला कुर्ला (प) मुंबई 70 मो.नं. 9004845622

यातील फिर्यादी श्री इस्तियाक मेहमुद खत्री वय २९ वर्षे धंदा: ठेकेदार रा.ठी. फ्लॅट नं. ५०६ A/3 बिल्डींग ग्रीनपार्क हौसींग सोसायटी समोर, साने गुरुजी शाळा, पाकीजा हॉटेलच्या मागे सांताक्रुझ (प) मुंबई ५४ यांचा दिनांक ०९/०७/२०१९ रोजीचा मराठीत टंकलिखित केलेली फिर्यादी जबाब हेच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन समजण्यात आली असुन, सोबत जोडण्यात आली आहे.

समक्ष

(विनोद पवार)
पोलीस निरिक्षक
ला.प्र. विभाग, मुंबई

फिर्याद दिनांक–०९/०१/२०१९.

श्री. इश्तीयाक मेहमुद खत्री, वय २९ वर्षे, व्यवसाय: कॉन्ट्रक्टर, रा.ठि.– फ्लॅट नं.५०३, अे/३, ग्रीनपार्क सोसायटी, साने गुरूजी शाळेच्या समोर, पाकीजा हॉटेलच्या पाठीमागे, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई मोबाईल नं. ९००४४३५५७०, ८३६९५५०७८८

मी वरीलप्रमाणे असुन उपरोक्त नमुद पत्त्यावर माझ्या कुटूंबासमवेत भाडेतत्वावर राहावयास आहे. माझे कुटूंबात माझी पत्नी व माझी दोन मुले राहत आहेत. मी मुंबई इमारत दुरूस्ती व पुर्नरचना मंडळे या विभागाचे ठेकेदार ( प्रोपरायटर–अॅपेक्स इंडीया ) म्हणुन गेल्या ७ वर्षापासुन काम करीत आहे.

चर्नीरोड, मुंबई येथील इमारत क्रमांक ७८, व ७८/अे, अब्दुल रेहमान इस्टेट, (एम.एल.सी फंड), चर्नीरोड, मुंबई येथील जागेचे इमारत दुरूस्ती करीता म्हाडा यांनी ऑनलाईन टेंडर मागविलेले होते. त्याप्रमाणे दिनांक ३१/१०/२०१८ रोजी मी सदर जागेच्या इमारत दुरूस्ती करीताचे टेंडर माझे अॅपेक्स इंडीया या कंपनीस मिळण्याकरीता रू.५०४०/– ऑनलाईन टेंडरसाठी भरलेले होते परंतु सदरचे टेंडर पास झाले नसल्याने सदर टेंडर करीता भरलेली रक्कम रुपये ५०४०/– हे माझे कॉर्पोरेशन बॅकेचे खात्यावर दिनांक २६/१२/२०१८ रोजी जमा झाले होते. माझ्या दुसरे टेंडर इमारत क्रमांक २८२, २८६ (बोर्ड फंड), ई.आर. रोड, ग्रॅटरोड पुर्व मुंबई या टेंडर बाबत चौकशी करता मी म्हाडाचे लेखाधिकारी, परिमंडळ–१/दु.व.पु. मंडळ, म्हाडा, वांद्रे मुंबई यांच्या कार्यालयात गेलो असता तेथील श्री. रशीद अली हैदर शेख, विभागीय लेखापाल, विभाग–१, कार्यालय– सहाय्यक लेखाधिकारी यांच्याकडे सदर टेंडर बाबत विचारना केली असता श्री. रशीद अली हैदर शेख यांनी माझेकडे इमारत क्रमांक ७८, व ७८/अे, अब्दुल रेहमान इस्टेट, (एम.एल.सी फंड), चर्नीरोड, मुंबई येथील मी भरलेल्या टेंडरचे माझ्या खात्यावर जमा झालेल्या रक्कम रू.५०४०/– पैकी रुपये २०००/– लाचेची मागणी केली व सदरची लाच न दिल्यास माझे ऑनलाईन सादर केलेले इमारत क्रमांक २८२, २८६ (बोर्ड फंड), ई.आर. रोड, ग्रॅटरोड पुर्व मुंबईचे दुसरे टेंडर रू. ८,९४०/– ऑनलाईन टेंडरची ईएमडी अटकावुन ठेवीन असे मला सांगितले.

लोकसेवक रशीद अली हैदर शेख, विभागीय लेखापाल, विभाग–१, कार्यालय– सहाय्यक लेखाधिकारी, परिमंडळ–१/दु.व.पु. मंडळ, म्हाडा, वांद्रे मुंबई यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ०७/०१/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार देण्यासाठी आलो. त्यावेळी पोनि पवार यांनी रशीद अली हैदर शेख हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज स्वहस्तक्षरात लिहून घेतला व त्यावर माझी सही घेतली. त्यानंतर पोनि पवार यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यावर पोनि पवार यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि पवार यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि पवार यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पोनि पवार यांनी पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्यान माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे दि. ०७/०१/२०१९ रोजी मला रशीद अली हैदर शेख, विभागीय लेखापाल, विभाग–१, कार्यालय– सहाय्यक लेखाधिकारी, परिमंडळ–१/दु.व.पु. मंडळ, म्हाडा कार्यालय, वांद्रे मुंबई येथे पडताळणीकरीता मला डिजीटल रेकॉर्डर लावून पंचासह पाठविले असता लोकसेवक रशीद अली हैदर शेख यांची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक व माझी माझे टेंडर संदर्भात चर्चा झाली. त्यावर

लोकसेवक यांनी इमारत क्रमांक ७८, व ७८/अे, अब्दुल रेहमान इस्टेट, (एम.एल.सी फंड), चर्नीरोड, मुंबई येथील माझ्या खात्यावर जमा झालेल्या पैशातून रुपये २०००/— लाचेची मागणी केली व सदरची लाच न दिल्यास माझे ऑनलाईन सादर केलेले दुसरे टेंडर इमारत क्रमांक २८२, २८६ (बोर्ड फंड), ई.आर. रोड, ग्रॅटरोड पुर्व मुंबई रू. ८,९४०/— ऑनलाईन टेंडरची ईएमडी अटकावुन ठेवीन असे मला सांगितले.

त्यानंतर मी पुन्हा पोलीस वाहनाजवळ आलो असता पोनि पवार यांनी व्हाईस रेकॉर्डर काढून झालेल्या संभाषणाची हकीकत विचारून व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण ऐकुन लोकसेवक यांची पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निष्पन्न झाल्याने व लोकसेवक यांना लाच रक्कम उदया दि. ०८/०१/२०१९ रोजी दयावयाची असल्याने पुढील कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर पोनि पवार यांनी मला घरी जाण्यास सांगून दिनांक ०८/०१/२०१९ रोजी सकाळी ०९.०० वा. ला.प्र.वि कार्यालय, मुंबई येथे येण्यास सांगितले.

पोनि पवार यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक ०८/०१/२०१९ रोजी ला.प्र.वि कार्यालयात सकाळी ०९.०० वाजता हजर झालो. त्यावेळी पोनि पवार यांनी मला लोकसेवक यांनी लाचेच्या रकमेची मागणी केली असुन आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्यावेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मला ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात नेवून माझे कडुन लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. २,०००/— (रू. ५००/— दराच्या ४ भारतीय चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांना अॅंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पोनि पवार यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यावर मला माझे मोबाईल क्रमांक ९००४४३५५७० वरून पोनि पवार यांचे मोबाईल क्रमांक ९८७०३४२२७३ वर व्हॉटस अप मॅसेज करण्याचा इशारा करण्यास सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही अशा ठिकाणी थांबून पुर्वनियाजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात पंचासमक्ष लाचेच्या रकमेस अॅंथ्रासीन पावडर लावली व सापळा कारवाईकरीता ब्युरो कार्यालयातून निघुन लोकसेवक यांचे म्हाडा कार्यालय, वांद्रे मुंबई येथे आलो. त्यावेळी माझे शर्टचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंचासह पाठविले व माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी लोकसेवकास त्यांच्या कार्यालयात भेटण्यास गेलो असता ते त्यांच्या कामात व्यस्त असल्याने त्यांनी मला परत पाठविले. त्यानंतर मी पुन्हा दुपारी १५.३५ वा. लोकसेवक यांना भेटण्यास त्यांचे कार्यालयात पंचासह गेलो असता लोकसेवक हे कार्यालयात उपस्थित होते. त्यावेळी मी लोकसेवक रशीद अली हैदर शेख हे बसलेल्या टेबल जवळ गेलो असता लोकसेवकाने माझ्याशी काहीही न बोलता हाताच्या इशाऱ्याने त्यांच्या टेबलावर डाव्या बाजुस असलेल्या फाईलचा कॉर्नर वर करून फाईलच्या खालच्या बाजुस लाचेची रक्कम ठेवण्याचा इशारा केला. त्याप्रमाणे मी माझ्याकडील अॅंथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. २,०००/— (रू. ५००/— दराच्या ४ भारतीय चलनी नोटा ) त्यांनी सांगितलेल्या फाईलखाली ठेवली. त्यानंतर मी त्यांचे कार्यालयातून बाहेर येवुन पोलीस पथकास लागलीच पुर्वनियोजीत माझे मोबाईल क्रमांक ९००४४३५५७० वरून पोनि पवार यांचे मोबाईल क्रमांक ९८७०३४२२७३ वर व्हॉटस अप मॅसेज केला त्यावेळी म्हाडा कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील, सहाय्यक लेखाधिकारी, परिमंडळ—१/दु.व.पु.मंडळ रू.नं. ३२५ मध्ये लागलीच पोलीसांनी लोकसेवक रशीद अली हैदर शेख यांस रूपये २०००/— लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले.

समक्ष

(विनोद पवार)
पोलीस निरिक्षक
ला.प्र.वि.मुंबई

तरी लोकसेवक रशीद अली हैदर शेख, विभागीय लेखापाल, विभाग–१, कार्यालय– सहाय्यक लेखाधिकारी, परिमंडळ–१/दु.व.पु. मंडळ, म्हाडा, वांद्रे मुंबई यांनी माझेकडे इमारत क्रमांक ७८, व ७८/अे, अब्दुल रेहमान इस्टेट, (एम.एल.सी फंड), चर्नीरोड, मुंबई येथील मी भरलेल्या टेंडरचे माझ्या खात्यावर जमा झालेल्या रक्कम रू.५०४०/– पैकी रुपये २०००/– लाचेची मागणी केली व सदरची लाच न दिल्यास माझे ऑनलाईन सादर केलेले इमारत क्रमांक २८२, २८६ (बोर्ड फंड), ई.आर. रोड, ग्रॅटरोड पुर्व मुंबईचे दुसरे टेंडर रू. ८,९४०/– ऑनलाईन टेंडरची ईएमडी अटकावुन ठेवीन असे सांगुन माझेकडून रू. २,०००/– लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीत समजावुन सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( विनोद पवार ),
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ............

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

............

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ............

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ............

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी निविदा करिता भरण्यात आलेली रक्कम परत मिळविण्या करिता आलोसे यांनी फिर्यादी यांचे कडे रुपये २०००/-ची लाच मागणी व लाच न दिल्यास पुढील निविदाची रक्कम अडकवुन ठेवण्याची धमकी देवुन फिर्यादी यांचे कडे अप्रामाणिक पणे लाचेची मागणी करुण लाच रक्कम रुपये २०००/- स्विकारुन लाचेचा स्वला, साठी गैरलाभ स्विकारला म्हणुन भ्र.प्र. अधिनियम १९८८ (सुधारित अधिनियम २०१८) कलम ७ अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

विनोद कृष्णा पवार, पोलीस निरिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ............

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ............, जिल्हा ............, राज्य ............,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ............ (3) Transferred to P.S ............, District ............ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव. Name विनोद कृष्णा पवार

पदनाम Rank पोलीस निरिक्षक

तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई

Posting

Code No. of I.O. ............

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ............

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**